## प्रेसनोट

दि. ०७/०५/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून ग्रामपंचायत पळशी, ता. बारामती, जि. पुणे येथील ग्रामपंचायत अधिकारी यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | वडगांव निंबाळकर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४३ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. कांता बापुराव काळाणे, वय ५७ वर्ष, पद-ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) ग्रामपंचायत – पळशी, ता. बारामती, जि. पुणे. (वर्ग-३, अराजपत्रित) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- (तीस हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | २५,०००/- (पंचविस हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २५,०००/- (पंचविस हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | ७/०५/२०२५ |
| सापळा दिनांक | ७/०५/२०२५ रोजी |
| ठिकाण | पळशी ग्रामपंचायतचे हद्दीत सार्वजनिक रस्त्यावर, ता.बारामती, जि.पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. अमोल भोसले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९५२७३१७५२७) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे सरकारी ठेकेदार असून, त्यांच्याकडे ठेकेदारीचे लायसन्स आहे. तक्रारदार यांनी बारामती तालुक्यातील पळशी गावच्या हद्दीत एका पाणी साठवण सिमेंट बंधाराचे काम केले होते. सदर कामाचे बिल १६,४६,०००/- रुपये असून, ते बिल मंजूर होण्याकरीता लोकसेवक कांता काळाणे यांनी तक्रारदाराकडे बिलाच्या रकमेच्या ४ % प्रमाणे ६०,००० रुपयाची स्वतःसाठी लाच मागणी केल्यानंतर, लोकसेवक कांता काळाणे यांनी त्या कामाच्या बिलाचा १४,९६,०००/- रुपयाचा पहिला चेक देताना मागितलेल्या ६०,००० रुपयापैकी ३०,००० रुपये तक्रारदाराकडून रोख घेतले. तक्रारदाराने केलेल्या कामाचे उर्वरित १,५०,००० रुपयाचे बिल काढण्यासाठी लोकसेवक कांता काळाणे हे तक्रारदाराकडे उरलेली ३०,००० रुपयाची लाच रक्कम वारंवार मागत असल्याची तक्रार दि. ६/०५/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. ७/०५/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक कांता काळाणे यांनी तक्रारदाराच्या वरील कामासाठी तक्रारदाराकडे सुरवातीस ३०,००० रुपये लाच मागणी करुन, तडजोडीअंती २५,००० रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज दि. ७/०५/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक कांता काळाणे यांनी तक्रारदाराकडे त्यांनी केलेल्या बंधा-याच्या कामाचे उर्वरित बिल मंजूर करुन देण्यासाठी पळशी ग्रामपंचायतचे हद्दीत सार्वजनिक रस्त्यावर लोकसेवक कांता काळाणे यांनी तक्रारदाराकडून २५,००० रुपयाची लाच पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचे विरुद्ध वडगांव निंबाळकर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

७/५/२५

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सत्यमेव जयते

Scanned with CamScanner